दिन विशेष...

* आंतरराष्ट्रीय स्काऊट दिवस.
* सेंट लुशियाचा स्वातंत्र्यदिन.

१९४४ : कस्तुरबा गांधी यांचे निधन.
१९५४ : पहिली कापड गिरणी मुंबईत सुरु.
१९५८ : मौलाना आझाद यांचे निधन.

महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

सेन्सेक्स ८२,८१४.७१ +३१६.५७ (०.३८%)
डॉलर ₹ ९०.७३

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | १९ |
| दिल्ली | २८ | १४ |
| मुंबई | ३५ | २२ |
| नागपूर | ३३ | १९ |
| पुणे | ३४ | १८ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक १०३ किंमत : ५ रु. | पाने ४


**सुविचार**

आपल्या भूतकाळाची स्वीकृती देऊन, भविष्याकडे आशावादाने पाहा.

**सूर्योदय - सूर्यास्त**
स.-६:५४ संध्या-६:२९

**सोने – चांदी**
सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६१,४३५/- २,७५,०००/-

**केळी भाव**
नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# भाजप–सेनेचा ठरला फॉर्म्युला!

## राज्यसभेच्या ७ जागांसाठी पुढच्या महिन्यात होणार निवडणूक; राऊतांचं काय होणार?

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यसभेच्या ७ जागांसाठी पुढच्या महिन्यात निवडणूक होणार आहे. सध्याचं पक्षीय बलाबल पाहता भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या महायुतीचं पारडं बरंच जड आहे. मविआला केवळ १ जागा मिळू शकते,असे चित्र निर्माण झाले आहे.**





राज्यसभेच्या ७ जागांसाठी पुढील महिन्यात निवडणूक होत आहे. महायुती आणि महाविकास आघाडीचं संख्याबळ पाहता त्यांच्या अनुक्रमे ६ आणि १ जागा निवडून येऊ शकतात. महाविकास आघाडीतील तीन पक्ष मिळून कोणाला उमेदवारी देणार याकडे लक्ष लागले आहे.

**सध्याचं पक्षीय बलाबल काय?**

सध्याच्या घडीला विधानसभेत भाजपचे १३१, शिंदेसेनेचे ५७ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ४० आमदार आहेत. राज्यसभेच्या उमेदवारांसाठी ३७ मतांचा कोटा आहे. त्यामुळे भाजपचे ३, शिंदेसेना आणि राष्ट्रवादीचा प्रत्येकी १ जण सहज निवडून येऊ शकतो. मात्र, यानंतरही तिन्ही पक्षांकडे बरीच मतं शिल्लक राहतात. त्याच्या आधारे आणखी एक सदस्य निवडून येऊ शकतो.

**अतिरिक्त मतं कोण कोणाला देणार?**

भाजप आणि शिंदेसेनेकडे १५ पेक्षा अधिक अतिरिक्त मतं आहेत. ही मतं कोण कोणाला देणार यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत. भाजपनं त्यांच्याकडे असलेली अतिरिक्त मतं शिंदेसेनेच्या उमेदवाराकडे वळवल्यास एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा दुसरा उमेदवार विजयी होऊ शकतो.

**शिंदेसेनेकडून कोणाला उमेदवारी?**

शिंदेसेनेकडून राहुल शेवाळे आणि संजय निरुपम यांची नावं राज्यसभेसाठी चर्चेत आहेत. दोघेही माजी खासदार आहेत. राहुल शेवाळे २०१४ ते २०२४ या कालावधीत लोकसभेचे खासदार होते. तर संजय निरुपम शिवसेना एकसंध असताना १९९६ ते २००५ या कालावधीत राज्यसभेवर होते. सेनेला एकच जागा मिळत असल्यानं निरुपम यांचं नाव मागे पडलं आहे. शेवाळे यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे.

नुकत्याच झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत शिंदेसेनेला माफक यश मिळालं आहे. मुंबईत शिंदेसेनेचा केवळ एक खासदार आहे. त्यामुळे राहुल शेवाळे यांना संधी देऊन उद्धव ठाकरेंच्या होमपीचवर पक्ष मजबूत करण्याचा शिंदेंचा विचार आहे. त्यामुळे निरुपम यांच्या जागी शेवाळेंना पसंती मिळू शकते. निरुपमदेखील मुंबईचे असले तरी पक्ष बांधणीच्या निकषावर ते मागे पडतात.

**चतुर्वेदींकडून लॉबिंग सुरु**

उद्धवसेनेच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांचा राज्यसभेचा कार्यकाळ २ एप्रिलला संपत आहे. याच दिवशी शरद पवार यांचाही कार्यकाळ संपेल. मविआकडे एकाच उमेदवाराला विजयी करता येईल इतकं संख्याबळ आहे. त्यातच चतुर्वेदी यांनी राज्यसभेची खासदारकी टिकवण्यासाठी लॉबिंग सुरु केलं आहे. त्यांनी उद्धव ठाकरे यांची नुकतीच भेट घेतली. दिल्लीत त्यांचं उत्तम नेटवर्क आहे.

**...तर राऊतांची राज्यसभेची वाट अवघड**

संजय राऊत यांचा राज्यसभेचा कार्यकाळ २०२८ मध्ये संपणार आहे. आता प्रियांका चतुर्वेदी यांच्यासाठी राज्यसभा किंवा उद्धव ठाकरे यांच्यासाठी विधान परिषद सुटल्यास २०२८ मध्ये शिवसेना उबाठाला संधी मिळण्याची शक्यता धूसर होईल. त्यामुळे फायरब्रँड नेते असलेल्या राऊत यांची राज्यसभेवर जाण्याची वाट बिकट होईल,असे सध्या संख्याबळावरुन चित्र दिसत आहे.

### • विधान परिषदेची जागा कोणाला?

राज्यसभेची जागा ठाकरेसेनेला सुटल्यास चतुर्वेदी यांची वर्णी लागू शकते. पण शरद पवारांनी राज्यसभेची इच्छा व्यक्त केल्यास चतुर्वेदी यांची संधी हुकू शकते. त्यातच मे मध्ये उद्धव ठाकरेंचा विधान परिषदेचा कार्यकाळ संपत आहे. त्यांना पुन्हा निवडून येण्यासाठी संपूर्ण मविआची गरज लागेल. आता राज्यसभा शरद पवारांना आणि मग विधान परिषद उद्धव ठाकरेंना गेल्यास संजय राऊतांची अडचण होईल.

### सामनावीरांचा सामना टळणार

**संजय निरुपम यांना संधी मिळणार नसल्याचं स्पष्ट झाल्यानं राज्यसभेत दोन संजय यांचा सामना टळेल. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडून संजय राऊत राज्यसभेवर आहेत. सत्ताधाऱ्यांविरोधात ते सातत्यानं आक्रमक पवित्रा घेतात. विशेष म्हणजे दोन्ही संजय यांची पार्श्वभूमी सामनाची आहे. संजय राऊत शिवसेनेचं मुखपत्र असलेल्या सामनाचे संपादक आहेत. तर संजय निरुपम यांनी सामनाची हिंदी आवृत्ती दोपहर का सामनाचं संपादकपद भूषवलं आहे. संपादक असतानाच त्यांना सेनेनं राज्यसभेवर पाठवलं होतं.**

## थोडक्यात

### वाघाच्या हल्ल्यात महिला ठार

**नागपूर ।** जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील देवलापार परिसरातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. या ठिकाणी वाघाच्या हल्ल्यात शेतात काम करणाऱ्या महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. देवलापार परिसरातीलल सावरा गावाजवळ शेतशिवारात ही घटना घडली. मुक्ता जोगड्या मरसकोल्हे असे वाघाच्या हल्ल्यात मयत महिलेचे नाव आहे. देवलापार आणि आसपासच्या गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वाघाचा मुक्त संचार सुरु आहे. शेताच्या बांधावर पायांचे ठसे, जनावरांवर हल्ल्याच्या घटना यामुळे नागरिकांमध्ये आधीच भीती होती. मयत मुक्ता या दुपारच्या सुमारास शेतात काम करत असताना अचानक वाघाने त्यांच्यावर झडप घातली. हल्ला अत्यंत भीषण स्वरूपाचा होता. महिलेचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

### पंतप्रधान मोदी इस्रायल दौऱ्यावर

**नवीदिल्ली ।** पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या २५-२६ फेब्रुवारी रोजी दोन दिवसांच्या इस्रायल दौऱ्यावर जाणार आहेत. या भेटीपूर्वी, भारत आणि इस्रायल हे दोन्ही देश संरक्षण आणि धोरणात्मक सहकार्य आणखी मजबूत करण्याची तयारी करत आहेत. दोन्ही देश नवीन संरक्षण तंत्रज्ञानावर संयुक्तपणे सहकार्य करण्याचा प्रयत्न करत आहेत. या भेटीदरम्यान सुरक्षा सहकार्याबाबत सामंजस्य करार होण्याची अपेक्षा आहे. परंतु, दोन्ही देशांमधील संरक्षण सहकार्य आधीच सुरू असल्याने कोणतेही मोठे संरक्षण करार केले जाणार नाहीत. येत्या काळात हे सहकार्य अंदाजे १० अब्ज डॉलर्सचे असण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. इस्रायल भारताला नवीन संरक्षण तंत्रज्ञान देण्यास तयार आहे.

# दिल्लीत दहशतवादी हल्ल्याच्या इशाऱ्याने सुरक्षा यंत्रणांना हाय अलर्टवर

## लष्कर-ए-तोयबाकडून हे ठिकाण रडारवर

वृत्तसंस्था । दिल्ली

**होळीच्या आधी, राष्ट्रीय राजधानी दिल्लीत मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा इशारा जारी करण्यात आला आहे. गेल्या नोव्हेंबरमध्ये लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटानंतर, दिल्लीत पुन्हा एकदा मोठ्या दहशतवादी हल्ल्याची भीती वाढली आहे.**



होळीच्या आधी, राष्ट्रीय राजधानी दिल्लीत मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा इशारा जारी करण्यात आला आहे. गेल्या नोव्हेंबरमध्ये लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटानंतर, दिल्लीत पुन्हा एकदा मोठ्या दहशतवादी हल्ल्याची भीती वाढली आहे. गुप्तचर माहितीच्या आधारे, दिल्लीत मोठ्या दहशतवादी हल्ल्याचा इशारा जारी करण्यात आला आहे, ज्यामुळे सुरक्षा यंत्रणांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, लष्कर-ए-तैयबा (एलईटी) लाल किल्ला, चांदणी चौक आणि प्रमुख मंदिरांना आयईडी स्फोटांनी लक्ष्य करण्याची योजना आखत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.६ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानातील इस्लामाबादमधील एका मशिदीत बॉम्बस्फोट झाला होता, ज्यामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडले होते. तेव्हापासून, लष्कर-ए-तैयबा (एलईटी) भारतात हल्ल्याची योजना आखत आहे. लष्कर-ए-तैयबा ही दहशतवादी संघटना दिल्लीत आयईडी हल्ला करण्याची योजना आखत असल्याचे वृत्त आहे. गुप्तचर सूत्रांनी

दिलेल्या माहितीनुसार, लष्कर-ए-तैयबाचे दहशतवादी लाल किल्ला आणि चांदणी चौकाजवळ स्फोट घडवण्याची योजना आखत आहेत. चांदणी चौकातील प्रमुख मंदिराला दहशतवाद्यांनी विशेषतः लक्ष्य केले आहे. सुरक्षा यंत्रणांना इनपुट मिळताच सुरक्षा वाढवण्यात आली. दिल्ली पोलिस आणि केंद्रीय यंत्रणांनी लाल किल्ला, चांदणी चौक आणि आसपासच्या धार्मिक स्थळांची सुरक्षा अधिक मजबूत केली आहे. (पान २ वर)

# पंतप्रधान मोदी पुन्हा सरेंडर होणार

## टॅरिफवरील निर्णयावरून राहुल गांधींचा पंतप्रधानांवर निशाणा

वृत्तसंस्था । नवीदिल्ली

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ वरील वादामुळे आता भारतात राजकीय गोंधळ उडाला आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प यांचे टॅरिफ बेकायदेशीर घोषित केल्यानंतर, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार हल्ला चढवला.**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफवरील वादामुळे आता भारतात राजकीय गोंधळ उडाला आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प यांचे टॅरिफ बेकायदेशीर घोषित केल्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार हल्ला चढवला. राहुल यांनी आरोप केला की, भारत-अमेरिका व्यापार करारात देशाच्या हितांशी तडजोड करण्यात आली आहे आणि सत्य आता समोर येत आहे. ट्रम्पच्या टॅरिफवरील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अमेरिकेच्या (पान २ वर)

# पुणे जिल्ह्यात भररस्त्यात हत्याकांड!

### • पिकअपने उडवलं, शस्त्रांनी घाव; दुहेरी खुनाचा बदला?

वृत्तसंस्था । दौंड

**पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील पाटस परिसर पुन्हा एकदा हिंसक घटनेने हादरला आहे. २०२१ मध्ये गाजलेल्या दुहेरी हत्याकांडातील एका आरोपीची शुक्रवारी रात्री पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर कुरकुंभजवळ हत्या करण्यात आली.**

या घटनेमुळे जुन्या वैराची ठिणगी पुन्हा भडकली का, याचा तपास पोलीस करत आहेत. महेश उर्फ मन्या संजय भागवत (वय २९, रा.पाटस) असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री सुमारे साडेआठच्या सुमारास भागवत हा आपल्या मित्रांसह दुचाकीवरून पाटसकडे जात होता. मुकदमवाडी उड्डाणपुलावर पाठीमागून आलेल्या पिकअप वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. धडकेनंतर ते खाली पडताच हल्लेखोरांनी धारदार शस्त्रांनी भागवतवर वार केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. गंभीर जखमी झालेल्या भागवतचा जागीच (पान २ वर)

# राज्यात ढगांच्या गडगडाटासह अवकाळी पावसाचा अंदाज

वृत्तसंस्था । मुंबई

महाराष्ट्रमध्ये हवामानात अचानक बदल होत असून उकाड्यानंतर आता अवकाळी पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. भारतीय हवामान विभागाने सोमवारी आणि मंगळवारी राज्यातील काही भागांत ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवला असून एकूण ११ जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. सोमवारी अहिल्यानगर, सांगली, सोलापूर, बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत ढगाळ वातावरण राहील.

# अजित पावर विमान अपघात प्रकरणात रोहित पवारांचा नवा दावा, कॅप्टनबद्दल केला गौप्यस्फोट

वृत्तसंस्था । दिल्ली

**दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत आजही अनेक प्रश्न अनुत्तरीत आहे. अशात आमदार रोहित पवार यांनी आज आणखी काही खळबळजनक दावे करत आरोप केले आहेत.**



दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी हे आरोप केले आहेत की, त्यांच्या आरोपानुसार अपघातातील विमानाची किंमत ३५ कोटी होती. मात्र, विमानाचा विमा २१० कोटींचा होता. तर पायलटचा विमा ५० कोटींचा होता.

यासह विमानाचा पायलट हा मानसिक तणावात होता का? त्याला ४ वर्ष नोकरी नव्हती, जेट ऐयरवेजमध्ये जेव्हा हे कपूर कामाला होते तेव्हा त्यांना महिन्याला १०-१२ लाख पगार होता. अलीकडे कुठेही नोकरी न मिळाल्याने त्यांनी ३ ते ४ लाख महिन्याला पगारवर व्हीआरएस जॉईन केलं होतं. त्यामुळे ते वैफल्यग्रस्त होते, आर्थिक तणावात होते, असा दावा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे.

**राजकीय किंवा व्यावसायिक कटकारस्थान?**

अजितदादांचे अपघात हे एक राजकीय किंवा (पान २ वर)

# विशेष गाड्या विस्ताराचा खान्देशातील प्रवाशांना होणार लाभ

## नंदुरबार, दोंडाईचा, अमळनेर, भुसावलसह २९ स्थानकांवर थांबा



प्रतिनिधी । जळगाव

**होळी सणाच्या पार्श्वभूमीवर उत्तर व पूर्व भारताकडे जाणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने अतिरिक्त विशेष गाड्या जाहीर केल्या आहेत. उधना-मालदा टाउन दरम्यान साप्ताहिक विशेष गाडीच्या एकूण आठ फेऱ्या चालविण्यात येणार असून, राजकोट-महबूबनगर साप्ताहिक विशेष गाडी मार्चअखेरपर्यंत विस्तारित करण्यात आली आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळू शकणार आहे.**

उधना-मालदा टाउन साप्ताहिक विशेष (०३४१८/०३४१७) गाडी २८ फेब्रुवारी ते २३ मार्च २०२६ या कालावधीत धावणार आहे. पैकी गाडी क्रमांक ०३४१८ उधना-मालदा टाउन विशेष गाडी दर सोमवारी दुपारी १२.३० वाजता उधना येथून सुटून बुधवारी पहाटे ०५.५५ वाजता मालदा टाउन येथे पोहोचेल. ही सेवा दोन ते २३ मार्च २०२६ दरम्यान एकूण चार फेऱ्या करेल. परतीची गाडी क्रमांक ०३४१७ मालदा टाउन-उधना विशेष दर शनिवारी दुपारी १२.१५ वाजता सुटून सोमवारी पहाटे ०२.१५ वाजता उधना येथे येईल. ही सेवा २८ फेब्रुवारी ते २१ मार्च २०२६ दरम्यान चार फेऱ्या करेल. अशा प्रकारे दोन्ही दिशांनी मिळून आठ फेऱ्या नियोजित करण्यात आल्या आहेत. या गाडीचा सरासरी प्रवास कालावधी सुमारे ३८ ते ४१ तासांचा आहे.

**खान्देशातील पाच स्थानकांवर थांबा**

उधना-मालदा टाउन साप्ताहिक विशेष गाडीला एकूण २९ स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे. चलथान, व्यारा, नवापुर, नंदुरबार, दोंडाईचा, अमळनेर, भुसावल, इटारसी, पिपरिया, मदन महल, कटनी, सतना, मानिकपूर, प्रयागराज छिवकी, पं. दीन दयाल उपाध्याय, सासाराम, गया, तिलैया, नवादा, शेखपुरा, किऊल, अभयपूर, जमालपूर, सुलतानगंज, भागलपूर, कहलगाव, साहिबगंज, बरहरवा आणि न्यू फरक्का ही महत्त्वाची स्थानके या मार्गावर समाविष्ट आहेत. मार्गातील औद्योगिक तसेच ग्रामीण भागांतील प्रवाशांना याचा विशेष फायदा होणार (पान २ वर)

# ३३ मुलांवर अत्याचार, इंजिनिअरसह पत्नीला मृत्युदंडाची शिक्षा

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**एका जोडप्याने ३३ लहान मुलांवर लैंगिक अत्याचार केल्याच्या प्रकरणात उत्तर प्रदेशातील न्यायालयाने त्या जोडप्याला दोषी ठरवत मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. पीडितांपैकी काही मुलांचं वय जेमतेम तीन वर्ष होतं. उत्तर प्रदेशातील बांदा येथे पॉक्सो कायद्याअंतर्गत विशेष न्यायाधीशांच्या न्यायालयाने हा ऐतिहासिक निकाल दिला.**



आरोपी रामभवन आणि त्याची पत्नी दुर्गावती यांना लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण (पॉक्सो) कायद्याच्या अनेक कलमांखाली दोषी ठरवण्यात आले. त्यामध्ये अनैसर्गिक संबंध, लैंगिक अत्याचार, लहान मुलांच्या अश्लील (पान २ वर)

महाराष्ट्राचे निडर दैनिक
शौर्य मराठी
epaper.shauryamarathi.com



# संपादकीय

## सर्वोच्च न्यायालयाचा लगाम

महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये न्यायदानाची प्रक्रिया केवळ कायद्याच्या कलमांवर आधारित नसून, ती पीडितेच्या वेदनांकडे न्यायालय किती संवेदनशीलतेने पाहते, यावर अवलंबून असते. विशेषतः बलात्कारासारख्या अमानवीय गुन्ह्यांमध्ये केवळ शारीरिक इजा नव्हे, तर पीडितेच्या मन–मस्तिष्कवर होणारा आघात आणि तिच्या सामाजिक अस्तित्वाचा विचार करणे आवश्यक असते. परंतु, दुर्दैवाने अनेकदा कनिष्ठ न्यायालयांकडून या मूलभूत बाबींकडे दुर्लक्ष होताना दिसते. अशा पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिलेला निकाल आणि ओढलेले ताशेरे हे भारतीय न्यायव्यवस्थेतील संवेदनशीलता शाबूत ठेवण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरले आहे. सदर प्रकरणास अलाहाबाद उच्च न्यायालयाने बलात्काराचा प्रयत्न या व्याख्येबाबत दिलेला एक वादग्रस्त निर्णय कारणीभूत ठरला. अलाहाबाद उच्च न्यायालयाने एका अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचाराच्या प्रयत्नाला ज्या प्रकारे सौम्य स्वरूपाचा गुन्हा मानले होते, ते धक्कादायक होते. शारीरिक बळाचा वापर करून अल्पवयीन मुलीच्या प्रतिष्ठेला धक्का लावणाऱ्या कृत्याला उच्च न्यायालयाने केवळ विनयभंग किंवा त्याहून कमी गंभीर मानून आरोपींना दिलासा देण्याचा प्रयत्न केला होता. सर्वोच्च न्यायालयाने पोक्सो कायदा आणि भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६ अंतर्गत आरोप निश्चित करून हे स्पष्ट केले आहे की, गुन्ह्याचा हेतू आणि त्या दिशेने टाकलेले पाऊल हे प्रत्यक्ष कृत्याइतकेच गंभीर मानले पाहिजे. एका अल्पवयीन मुलीचे शरीर ओढणे, तिच्या कपड्यांशी छेडछाड करणे आणि तिला फरफटत नेण्याचा प्रयत्न करणे, ही केवळ गुन्ह्याची तयारी होती, बलात्काराचा प्रयत्न नाही, असे अलाहाबाद न्यायालयाने म्हटले होते. या संकुचित व्याख्येनुसार, जोपर्यंत प्रत्यक्ष शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याच्या दिशेने थेट अंतिम पाऊल उचलले जात नाही, तोपर्यंत त्याला गंभीर गुन्हा मानता येणार नाही, असा तर्क लावण्यात आला होता. हा तर्क पूर्णतः कायद्याविषयी संभ्रम निर्माण करणारा, गुन्हेगारांचे मनोबल वाढवणारा आणि पीडितेच्या वेदनांकडे डोळेझाक करणारा होता. उल्लेखनीय बाब म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात स्वतःहून दखल घेत अत्यंत सार्थ हस्तक्षेप केला. फौजदारी कायद्यामध्ये प्रयत्न आणि तयारी यामध्ये एक सूक्ष्म पण अत्यंत महत्त्वाची रेषा असते. जेव्हा एखादी व्यक्ती गुन्ह्याच्या इराद्याने अशी कृती करते तेव्हा तो गुन्हा करण्याचा प्रयत्नच मानला जातो. सदर प्रकरणामध्ये पीडितेवर झालेला शारीरिक हल्ला, तिला विवस्त्र करण्याचा प्रयत्न आणि जबरदस्तीने ओढून नेणे, हे लैंगिक छळाच्या दिशेने टाकलेले सुनियोजित पाऊलच होते. प्रत्यक्षदर्शींनी पीडितेचा आक्रोश ऐकून वेळीच हस्तक्षेप केला नसता, तर त्या नराधमाचा हेतू पूर्ण झाला असता. अशा परिस्थितीत, केवळ बाह्य हस्तक्षेपाने गुन्हा पूर्ण झाला नाही म्हणून त्याला गुन्ह्याचा प्रयत्न न मानता तयारी म्हणणे, हा शब्दच्छल अल्पवयीन मुलांच्या असुरक्षिततेची थट्टा करण्यासारखा होता. सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय अशा वेळी आला आहे जेव्हा देशभरातील विविध न्यायालयांच्या लैंगिक न्यायाप्रती असलेल्या दृष्टिकोनावर समाजातून टीका केली जात आहे. कायद्याच्या युक्तिवादांनी केवळ कलमांची चौकट न पाहता घटनात्मक मूल्यांचे रक्षण करणे आवश्यक असते. कोणत्याही सुसंस्कृत समाजात नागरिकांना केवळ घडलेल्या गुन्ह्यापासूनच नव्हे, तर संभाव्य धोक्यापासून वाचवणे हे कायद्याचे प्राथमिक उद्दिष्ट असते. त्याअर्थाने कायदे हे एक प्रकारचा धाक निर्माण करण्याचे काम करतात. कायद्यांमुळेच अनेक गुन्हे टळतात, हे वास्तव आहे. असे असताना उच्च न्यायालयाने कायद्यांचा चुकीचा अर्थ लावल्यास समाजात विचित्र आणि विदारक परिस्थिती उद्भवण्याची शक्यता असते.

# अडावद येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील अडावद येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. यावेळी विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, भाषणे सादर करून शिवभक्तांना त्यांच्या जीवनातील प्रेरक गोष्टी सांगितल्यात.**



सकाळी १० वाजता विघ्नहर्ता चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करीत पुतळ्यास माल्यार्पण करून करीत आरती करण्यात आली. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य शांताराम पाटील, जिल्हा परिषद शाळेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक शांताराम पवार यांनी महाराजांच्या जीवनावर भाषण केले.

शालेय विद्यार्थ्यांनी पाळणा, गीते यांवर नृत्य सादर केली. तसेच काही महाराजांच्या जीवनातील प्रेरक प्रसंग कथन करीत आजच्या परिस्थितीत त्यांची कशी आवश्यकता आहे याबाबत विविध उदाहरणे देऊन श्रोत्यांच्या मनाला भिडणारे भाषणे केलीत.

या कार्यक्रमास सरपंच बबनखा तडवी, माजी जिल्हा परिषद सदस्य शांताराम पाटील, माजी उपसरपंच व चोसाका संचालक दिनकर देशमुख, माजी विकासो चेअरमन वसंत धनगर, माजी सभापती कामधेनू दुग्धोत्पादक संस्था संजय पाटील, माजी विकासो संचालक श्रीकांत दहाड, माजी उपसरपंच हनुमान महाजन, राजेश देशमुख, चंद्रकांत पाटील, माजी पीक संरक्षण संस्थेचे चेअरमन लक्ष्मण महाजन, व्यापारी सुनील सारस्वत, माजी विकासो चेअरमन अनिल देशमुख, माजी विकासो चेअरमन सचिन महाजन, माजी चोसाका संचालक राजेश देशमुख, विकासो संचालक प्रकाश महाजन, वडगावचे माजी सरपंच नामदेव पाटील, मितावलीचे ग्राम पंचायत सदस्य मंगल इंगळे, ग्रामपंचायत सदस्य पंकज महाजन, ग्राम पंचायत सदस्य तुषार देशमुख, ग्रामधिकारी प्रमोद सैंदाने, कामधेनू दुग्धोत्पादक संस्थेचे सभापती राजेंद्र पाटील, माजी सभापती नीलेश देशमुख, प्रा. लक्ष्मण पाटील, हरिश पाटील, टिंगू देशमुख, निलेश देशमुख, चंद्रकांत महाजन, जिल्हा परिषद शिक्षक खंडेराव देशमुख, प्रमोद देशमुख, विकासो चेअरमन भूषण देशमुख, डॉ. नेवे, ग्रामपंचायत सदस्य पारधी, गणेश खजुरे ग्रामपंचायतचे लिपीक पुरुषोत्तम महाजन, रफिक मण्यार, पि. आर. माळी आदींसह शेकडो शिवप्रेमी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रा. लक्ष्मण पाटील यांनी व्यक्त केले.

# बाल गोपाळांची सहल अमळनेर येथे उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

शुभास्ते पंथानः सन्तु..! या मंगल शुभेच्छांसह पंकज बालसंस्कार केंद्र, चोपडा येथील बालगोपाळांची शैक्षणिक व अध्यात्मिक सहल अमळनेर येथील प्रसिद्ध श्री मंगळग्रह मंदिर येथे अत्यंत आनंदी व उत्साही वातावरणात पार पडली.

सहलीसाठी रवाना होण्यापूर्वी वाहनाचे पूजन मुख्याध्यापक एम.व्ही.पाटील, विभाग प्रमुख मीना माळी, पालक प्रतिनिधी व शिक्षिका यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना सहलीदरम्यान शिस्त, सुरक्षितता आणि परस्पर सहकार्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच विद्यार्थ्यांशी मुक्त संवाद साधून त्यांच्या मनातील उत्साहाला प्रोत्साहन दिले. मंदिर परिसरात पोहोचल्यावर मुलांनी निसर्गाच्या सानिध्यात आणि अध्यात्मिक वातावरणात आनंद लुटला. मंगळग्रह संस्थानच्या वतीने विद्यार्थ्यांना संपूर्ण परिसराची माहिती देण्यात आली. तसेच प्रसादाचे वितरण करण्यात आले. संस्थानच्या व्यवस्थापनाकडून विद्यार्थ्यांची योग्य ती काळजी घेण्यात आली. मंदिर परिसरातील सुंदर बागेत विद्यार्थ्यांनी मनसोक्त खेळत आनंद द्विगुणित केला. शाळेकडून विद्यार्थ्यांसाठी भोजन व आईस्क्रीमची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. आईस्क्रीमचा आस्वाद घेताना मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य हा सहलीचा खरा आनंद ठरला. या सहलीत शिशु गटापासून मोठ्या गटापर्यंत, म्हणजेच तीन ते सहा वर्षे वयोगटातील सर्व विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते. या सहलीमुळे विद्यार्थ्यांना अध्यात्म, निसर्ग व सहजीवनाचे संस्कार प्रत्यक्ष अनुभवातून मिळाले. एकूणच, पंकज बालसंस्कार केंद्राची ही मंगल सहल विद्यार्थ्यांच्या मनात अविस्मरणीय आठवणींचा ठेवा निर्माण करून गेली.





**जळगाव – जि. प. प्रा. शा. फुपणी येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शाळेचे मुख्याध्यापक सोमनाथ पाटील यांनी शिवरायांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. शाळेतील विद्यार्थ्यांनी भाषणे केली. ज्योत्स्ना गजरे यांनी शिवरायांच्या बालपणीच्या गोष्टी सांगितल्या.**

# छत्रपती शिवाजी महाराज की जयचा गुंजला नारा

प्रतिनिधी । भुसावळ

**येथील भारतीय जनता पार्टीतर्फे शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**



यावेळी महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी भुसावळ रेल्वे स्थानकाजवळील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून वंदन केले. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जय घोष करीत छत्रपती शिवाजी महाराज की जय..! जय भवानी जय शिवाजी..! घोषणा दिल्या. जयंती निमित्त पुतळ्याचा संपुर्ण परिसर हा सुशोभित करण्यात आला असून रात्री पासुनच महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास वंदन करण्यासाठी शिवभक्तांची मोठ्या संख्येने गर्दी दिसून येत होती. यावेळी भारतीय जनता पार्टीचे गटनेते युवराज लोणारी, उपनगराध्यक्ष शैलेजा नारखेडे, शहराध्यक्ष संदीप सुरवाडे, किरण कोलते, पिंटू कोठारी, परिक्षित बऱ्हाटे, मनोज बियाणी, प्रमोद नेमाडे, पुरुषोत्तम नारखेडे, बापू महाजन, बोधराज चौधरी, गिरीश महाजन, राजेंद्र आवटे, आशिष पटेल, सुजित भोळे, अल्बर्ट तायडे, विलास सातदिवे, कैलास पाटील, अमोल महाजन, सागर चौधरी, जयंत माहुरकर, महिला आघाडीच्या अनिता आंबेकर, वैशाली सेतवाल, शोभा इंगळे, राजू खरारे, शंकर शेळके, प्रा प्रशांत नरवाडे, रवी ढगे, चेतन बोरोले, अमोल पाटील, संतोष ठोकळ, रिषभ राजपूत, वसंत पाटील, प्रमोद पाटील, अभिजीत मराठे, शैलेंद्र ठाकरे, किरण पाटील, उदय पाटील, प्रा.प्रशांत पाटील, रुपेश देशमुख, कैलास शेलोडे, गौरव आवटे, गुड्डू शेठ अग्रवाल यांची उपस्थिती होती.

# पान १ वरुन

### पुणे जिल्ह्यात भररस्त्यात......

मृत्यू झाला. हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले असून पोलिसांनी परिसर सील करून तपास सुरू केला आहे. या प्रकरणी महेश मारुती टुले यांनी दौंड पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. आनंद माकर, विकी शितकल, संतोष शितकल (रा. आंबिकानगर, पाटस) यांच्यासह दोन अज्ञात व्यक्तींवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांच्या नेतृत्वाखाली तपास पथक आरोपींचा शोध घेत आहे. विशेष म्हणजे, ४ जुलै २०२१ रोजी पाटस येथील तामखडा भागात शिवम शितकल आणि गणेश माकर या दोघांची हत्या झाली होती. त्या प्रकरणात महेश भागवत याच्यासह काही जणांवर गुन्हा नोंदवण्यात आला होता आणि ते जामिनावर मुक्त होते. त्यामुळे सध्याच्या घटनेचा त्या जुन्या प्रकरणाशी संबंध आहे का, याबाबत विविध तर्कवितर्क सुरू आहेत.

### दिल्लीत दहशतवादी हल्ल्याच्या......

पोलिस आणि सुरक्षा दल गर्दीच्या ठिकाणी विशेष लक्ष ठेवून आहेत. १० नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी वाहतुकीतून जात असताना एका कारचा स्फोट झाला. अनेक वाहनांना आग लागली. या अपघातात अनेक लोकांचा मृत्यू झाला. स्फोटापूर्वी तीच कार लाल किल्ल्याच्या पार्किंगमध्ये ३ तास उभी होती. या दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी दिल्लीसह देशभरात छापे टाकले आणि अनेक लोकांना अटक करण्यात आली.

### अजित पावर विमान......

व्यावसायिक कटकारस्थान असू शकते आणि डीजीसीएचे मोठे अधिकारीही यामागे आहेत, असा अरोपही रोहित पावर यांनी केला आहे. तसेच व्हीएसआर कंपनीला खूप मोठ्या लोकांचा पाठिंबा असून यात सत्तेतील आणि राजकीय संबंध असलेले मोठे उद्योगपती सामील आहेत. त्यामुळे अजित दादांना न्याय मिळवून देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांनीच या तपासात लक्ष दिले पाहिजे. तसेच राहुल गांधी यांनाही हा विषय आपल्या हाती घ्यावा आणि नागरी उड्डाण मंत्र्यांचा राजीनामा मागण्यात आम्हाला साथ द्यावी, अशी मागणी देखील रोहित पवारांनी केली आहे. दरम्यान, अकाउंटेबल, फ्लाईट सेफ्टी मॅनेजरची चौकशी झाली का? त्यांना अटक झाली का? या जबाबदार व्यक्ती आहेत. ही व्यक्तीचं मोठं प्रस्त आहे, म्हणून त्यांना वाचनावण्यात येतंय. यातील एका कंपनी अधिकाऱ्यांवर अत्याचाराचे आरोप आहेत. लायसन्स नसताना अनधिकृतपणे विमान चावण्यात येत होते. तर भाजपचे ट्रोल या पत्रकार परिषदेला ट्रोल करत आहेत. आम्हाला प्रश्न पडतो की भाजपच्या ट्रोलकडून इतका विरोध का? त्या ट्रोलला पैसे कोण देतंय? ते भाजपची बाजू मांडत असतात हे आम्हाला माहिती आहे. यांनी पूर्वी रोहित शेट्टींना ब्लॅकमेल केलं होतं. भाजपचे ट्रोल जर विरोध करतात तर मग या कटात भाजपही सहभागी आहे का? अशी शंका निर्माण होते, असेही रोहित पवार म्हणाले.

### पंतप्रधान मोदी पुन्हा......

सर्वोच्च न्यायालयाने डोनाल्ड ट्रम्प यांनी लादलेले टॅरिफ रद्द केले, असे म्हटले की राष्ट्रपतींना असे टॅरिफ लावण्याचा अधिकार नाही. न्यायालयाच्या निर्णयानंतर काही तासांतच ट्रम्प यांनी १० टक्के जागतिक टॅरिफची घोषणा केली. ते म्हणाले की, ते एका नवीन आदेशावर स्वाक्षरी करणार आहेत. ज्यामुळे जगभरातील देशांवर १० टक्के जागतिक टॅरिफ लादला जाईल. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सोशल मीडियावर एका पोस्टमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला. त्यांनी लिहिले, पंतप्रधानांनी तडजोड केली आहे, परंतु त्यांची फसवणूक आता उघड झाली आहे. ते पुन्हा वाटाघाटी करू शकत नाहीत; ते पुन्हा शरण जातील,असा टोला त्यांनी लगावला आहे.

### ३३ मुलांवर अत्याचार......

चित्रफिती बनवणे आणि गुन्हेगारी कट रचणे यांचा समावेश आहे. न्यायालयाने सरकारला प्रत्येक पीडित मुलाला १० लाख रुपये भरपाई देण्याचे आदेश दिले. या व्यतिरिक्त आरोपींच्या घरातून जप्त केलेली रक्कम पीडितांमध्ये समान प्रमाणात वाटली पाहिजे, असेही न्यायालयाने म्हटले आहे. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) ऑक्टोबर २०२० मध्ये रामभवन आणि इतरांविरुद्ध मुलांवरील लैंगिक शोषणाच्या आरोपावरून खटला दाखल केला होता. आरोपींनी २०१० ते २०२० दरम्यान उत्तर प्रदेशातील बांदा आणि चित्रकूटमध्ये लैंगिक गुन्हे केल्याचे तपासादरम्यान सीबीआयला आढळून आले. गुन्हे क्रूर स्वरुपाचे होते. काही पीडितांच्या गुप्तांगांवर जखमा झाल्या होत्या, तर त्यापैकी काहींना वर्षानुवर्षे रुग्णालयात राहावे लागले. काहींना डोळ्यांना दुखापत झाली आहे. त्यापैकी बरेच जण अत्याचारामुळे झालेल्या मानसिक आघाताने ग्रस्त आहेत.

### विशेष गाड्या विस्ताराचा......

आहे. गाडीत एसी ३–टियर, स्लीपर वर्ग आणि जनरल सेकंड क्लासचे मिळून अंदाजे १८ ते २२ डबे जोडण्यात येणार आहेत. मागणीनुसार डब्यांची संख्या बदलू शकते, अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.राजकोट–महबूबनगर साप्ताहिक विशेष–०९५७५/०९५७६ राजकोट–महबूबनगर साप्ताहिक विशेष गाडी मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत वाढविण्यात आली आहे. गाडी क्रमांक ०९५७५ राजकोट–महबूबनगर ही सेवा दोन ते ३० मार्च २०२६ दरम्यान प्रत्येक सोमवारी धावेल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# श्री मुक्तेश्वर महादेव मंदिरात आजपासून महाप्राणप्रतिष्ठा सोहळा

प्रतिनिधी । धुळे

शहरातील चितोड रोडवरील लीलाबाई चाळ स्मशानभूमीलगतच्या कैलासनगर परिसरात श्री मुक्तेश्वर महादेव मंदिराची उभारणी पूर्ण झाली आहे. २२ ते २६ फेब्रुवारीदरम्यान महाप्राणप्रतिष्ठा सोहळा व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर परिसरात जय्यत तयारी सुरू असून मंदिर परिसर आकर्षकविद्युत रोषणाईने उजळून निघाला आहे. मंडप उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मनोज गर्दे यांच्या संकल्पनेतून तसेच कैलासनगरवासीय वशिवभक्तांच्या सहकायनि गेल्या तीन वर्षांपासून मंदिराची उभारणी करण्यात आली. दाक्षिणात्य शैलीतील या मंदिरामुळे परिसराच्या वैभवात भर पडली आहे.

# नागपुरात आरएसएस कार्यालयावर बामसेफचा आज महामोर्चा

## • जळगाव जिल्ह्यातून शेकडो कार्यकर्त्यांची राहणार उपस्थिती

प्रतिनिधी । जळगाव/धरणगाव

**बामसेफ, भारत मुक्ती मोर्चा व राष्ट्रीय ओबीसी मोर्चा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार,दि.२२ फेब्रुवारी रोजी नागपूर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) कार्यालयावर भारतीय संविधानाच्या सन्मानार्थ महामोर्चाचे आयोजन करण्यात आले.**

या आंदोलनात जळगाव जिल्हा येथून शेकडो कार्यकर्ते सहभागी झाल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली. महामोर्चामागे ओबीसी समाजाच्या विविध मागण्यांचा समावेश करण्यात आला. ओबीसींची जातीनिहाय जनगणना तातडीने करण्यात यावी, ईव्हीएम प्रणाली बंद करून पारदर्शक निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करावी, तसेच महापुरुषांच्या वारंवार होत असलेल्या अवमानाच्या घटनांचा निषेध नोंदवावा, अशा प्रमुख मागण्या आंदोलनकर्त्यांनी मांडल्या. संविधानाचे रक्षण, राष्ट्रीय एकता व अखंडता टिकवणे या उद्देशाने हा आंदोलनात्मक मोर्चा काढण्यात आल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, बामसेफचे अधिवेशन कटक येथे आयोजित करण्यात येणार होते. सर्व आवश्यक परवानग्या घेऊन तयारी पूर्ण झाली असतानाही अचानक परवानगी रद्द करण्यात आल्याचा आरोप आयोजकांनी केला. या निर्णयाच्या निषेधार्थ नागपूरातील आरएसएस कार्यालयावर महामोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. हा मोर्चा राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांच्या नेतृत्वाखाली पार पडत असून देशभरातून कार्यकर्त्यांची उपस्थिती अपेक्षित असल्याचे आयोजकांनी नमूद केले. आंदोलन शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. दरम्यान, जळगाव जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने नागपूरकडे प्रयाण केले, असे बहुजन मुक्ती पार्टीचे जळगाव जिल्हाध्यक्ष सुनील देहेडे यांनी सांगितले.

# शिवकॉलनीत शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिकृतीचे पूजन

प्रतिनिधी । जळगाव

**स्वराज्याचे रक्षक, निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य अफाट आहे. आयुष्यात आपण त्यांच्या जीवन चरित्रातून योग्य दिशा घेऊन वाटचाल केली पाहिजे, असे प्रतिपादन आ. राजूमामा भोळे यांनी केले.**



महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त १९ फेब्रुवारी रोजी प्रभाग ७ येथे शिवकॉलनी स्टॉप परिसरात महाराजांच्या एका भव्य–दिव्य प्रतिकृतीचा दर्शन सोहळा पार पडला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले.

याप्रसंगी आ. राजूमामा भोळे, महापौर दीपमाला काळे, नगरसेवक विशाल भोळे,नगरसेविका अंकिता पाटील, नगरसेवक चंद्रशेखर अत्तरदे, सामाजिक कार्यकर्ते नरेश सोनवणे, राम पवार उपस्थित होते. शिवराय मना–मनात, शिवजयंती घराघरात या संकल्पनेतून साकारलेला हा सोहळा शिवप्रेमींसाठी मोठा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र वाचन प्रत्येक कुटुंबीयांनी केले पाहिजे.त्यांचे मार्गदर्शक संदेश आपण आचरणात आणले पाहिजे, असे महापौर दीपमाला काळे म्हणाल्या. आयोजक पंकज सुरेश पाटील यांनी कार्यक्रम घेण्यामागील उद्देश्य स्पष्ट केला. शिवनेरी ग्रुपच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# मनपा सफाई कर्मचाऱ्यांची यादी सादर करण्याचे निर्देश

प्रतिनिधी । जळगाव

शहरातील प्रभाग १ ते १९ मधील सफाई कर्मचाऱ्यांसह प्रमुख अधिकाऱ्यांची यादी नगरसेवकांना सादर करण्याचे निर्देश मनपा प्रशासनाकडून देण्यात आले आहे. शहरातील दैनंदिन साफसफाई कामाबाबत सर्व पदाधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त केलेली असून बहुतांश सफाई कामगार कामावर नसल्याचे व काम पूर्ण वेळ करीत नसल्याचे तसेच हजेरी लावून घरी निघून जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. प्रभाग समिती क्रमांक एक ते चार अंतर्गत वार्ड क्रमांक १ ते १९ प्रभागातील कायम कर्मचाऱ्यांची व मक्तेदार यांच्याकडील कर्मचाऱ्यांची स्वतंत्र टाईप केलेली यादी मोबाईल नंबरसह (सफाई कामगार सोडून) सर्व नगरसेवकांना सोमवार दि. २३ रोजी पुरविण्यात यावी. सदर कामात कोणतीही दिरंगाई अथवा हलगर्जीपणा केल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल,असा इशाराही देण्यात आला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## खान्देश ट्रान्सप्लांट गेम्स - २०२६ रनिंग स्पर्धा...

# धरणगावच्या वसीम पिंजारींची दुहेरी सुवर्णकामगिरी

प्रतिनिधी । धरणगाव

**खान्देश ट्रान्सप्लांट गेम्स–२०२६ अंतर्गत आयोजित रनिंग स्पर्धेत धरणगावचे सामाजिक कार्यकर्ते वसीम हमीद पिंजारी यांनी उल्लेखनीय यश संपादन करत १०० मीटर आणि २०० मीटर या दोन्ही गटांत प्रथम क्रमांक पटकावला. ही स्पर्धा क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठच्या स्पोर्ट ग्राउंडवर उत्साहात पार पडली.**

जळगाव येथील छाया किडनी केअर अँड रिलीफ फाउंडेशन, आनंद हॉस्पिटल व डायलिसीस युनिट, सुखकर्ता फाऊंडेशन आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत विविध जिल्ह्यांतील स्पर्धकांनी सहभाग नोंदवत आपापली क्षमता सिद्ध केली. १०० मीटर आणि २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत वसीम पिंजारी यांनी उत्कृष्ट वेग व तंदुरुस्तीचे प्रदर्शन करत दोन्ही गटांत अव्वल स्थान मिळवले. या गटांमध्ये द्वितीय हर्ष शर्मा तर तृतीय प्रवीण आमोदकर यांनी पटकावला.



महिला गटात धावण्याचा स्पर्धेत प्रथम सायराबी शेख, द्वितीय वर्षा झोपे, तृतीय मनिषा पाटील यांनी बाजी मारली. त्याचप्रमाणे ५ किलोमीटरच्या पुरुष स्पर्धेत प्रथम अजय वसावे, द्वितीय जयपाक पावरा तर महिला गटातील ३ किलोमीटर स्पर्धेत मधुरा वसावे, जैदू बारेला अनुक्रमे मॅरेथॉनमध्ये विजयी झाल्यात. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी मान्यवरांच्या उपस्थितीत विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. कुलगुरू प्रा. डॉ. व्ही एल माहेश्वरी, प्रभारी कुलगुरू एस टी इंगळे, महापौर दीपमाला काळे, सुखकर्ता फाउंडेशन संचालक एरंडोल तथा नगराध्यक्ष डॉ. नरेंद्र ठाकूर, प्रा.अनिल डोंगरे, दत्तात्रय चौधरी, सुधीर चौधरी, डायरेक्टर मास-टेक कंट्रोल्स, मल्हार कम्युनिकेशन संचालक आनंद मल्हारा, खान्देश ट्रान्सप्लांट गेम्स टीम, संचालक डॉ. किशोर सूर्यवंशी, आनंद हॉस्पिटल संचालक डॉ.अमित भंगाळे आदी मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना प्रमाणपत्र व पदक प्रदान करण्यात आले. कार्यक्रमास उमवि स्पोर्ट्स, असो.चे डायरेक्टर दिनेश पाटील, प्रा.अतुल बोरकर, लीना लेले, सोनल चव्हाण, निकिता चौधरी आणि विद्यापीठाचे सहकार्य लाभले. धरणगाव येथील वसीम पिंजारी यांच्या दुहेरी यशाबद्दल कौतुक होत आहे.

## ६५ वर्षीय महिलेला लुटले, दीड लाखांचे दागिने लंपास

प्रतिनिधी । जळगाव

**शहरात तोतया पोलिसांनी पुन्हा एकदा डोके वर काढले असून, जुन्या जळगाव भागात एका वृद्ध महिलेला पोलीस असल्याची बतावणी करून सुमारे १ लाख ५६ हजार ९३१ रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात अज्ञात तीन भामट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

फिर्यादी कमलबाई एकनाथ सोनार (वय ६५, रा. स्नेह चौक, रामपेठ, जळगाव) या १० फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास जुन्या जळगावमधील भाग्यलक्ष्मी टेंट हाऊस चौकातून जात होत्या. यावेळी ३० ते ३५ वयोगटातील तीन अनोळखी इसम त्यांच्याजवळ आले. आम्ही पोलीस आहोत, अशी बतावणी करत त्यांनी कमलबाई यांना विश्वासात घेतले. पुढे साहेबांची तपासणी सुरू आहे, तुमचे दागिने काढून पिशवीत ठेवा, असे सांगून या भामट्यांनी कमलबाईंच्या अंगावरील सोन्याचे दागिने हातचलाखीने लंपास केले आणि तिथून पसार झाले. भामट्यांनी फिर्यादी महिलेकडून एकूण मुद्देमाल १ लाख ५६ हजार ९३१ रुपये लांबविण्यात आला आहे. घटना १० फेब्रुवारी रोजी घडली असली, तरी १९ फेब्रुवारी रोजी रात्री १०:४५ वाजता शनिपेठ पोलीस ठाण्यात याची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. तपास पोनि कावेरी कमलाकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार गणेश गुणराव नायकर हे करत आहेत.

## थोडक्यात

### के सी ई तंत्रनिकेतन विद्यार्थ्यांचे श्रमदान शिबिर उत्साहात

**जळगाव ।** के सी ई इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट स्वायत्त महाविद्यालय अंतर्गत कार्यरत तंत्रनिकेतन विभागातील विद्यार्थ्यांनी ङ्गसोशल लाईफ स्किलफ या विषयाच्या उपक्रमांतर्गत विविध ठिकाणी श्रमदान करून सामाजिक बांधिलकी जपली. विद्यार्थ्यांनी जळगाव शहरातील पांझरा पोळ गौशाळा (नेरी नाका), पंचवटी महादेव मंदिर, श्रद्धा कॉलनी, बुद्धिस्ट विहार वाघ नगर आदी भागांमध्ये स्वच्छता व श्रमदान उपक्रम राबविले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छता, जनजागृती आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. स्थानिक नागरिकांनीही विद्यार्थ्यांच्या कार्याचे कौतुक केले.

### गुरु तेग बहादुर साहेबांचा विद्यार्थ्यांनी पाहिला जीवनपट

**जळगाव ।** श्री संत ज्ञानेश्वर विद्यालयात हिंद दी चादर उपक्रमांतर्गत गुरु तेग बहादुर साहेबांचा जीवनपट विद्यार्थ्यांना चित्रफितीच्या माध्यमातून दाखविण्यात आला. त्यांच्या जन्मापासून ते बलिदानापर्यंतचा प्रेरणादायी प्रवास प्रभावी पद्धतीने सादर करण्यात आला. जीवनपट पाहताना विद्यार्थ्यांनी त्यांच्या त्याग, धैर्य आणि धर्मनिष्ठेची प्रेरणा घेतली. मुघल सम्राट औरंगजेब यांच्या काळातील परिस्थिती व धर्मस्वातंत्र्यासाठी दिलेले बलिदान याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली.

### जळगावात तरुणाची विषप्राशन करून आत्महत्या

**जळगाव ।** शहरात राहणाऱ्या एका ३३ वर्षीय तरुणाने विषारी औषध प्राशन करून आपली जीवनयात्रा संपवल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. पाच दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर अखेर गुरुवारी सकाळी या तरुणाचा मृत्यू झाला. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. ज्ञानेश्वर गहिनीनाथ नालकोट (वय ३३, रा. रामेश्वर कॉलनी, जळगाव) या तरुणाने १४ फेब्रुवारी २०२६ रोजी आपल्या राहत्या घरी काहीतरी विषारी औषध प्राशन केले होते. ही बाब लक्षात येताच त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना तातडीने उपचारासाठी जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (जिल्हा रुग्णालय) दाखल केले. ज्ञानेश्वर यांच्यावर गेल्या पाच दिवसांपासून अतिदक्षता विभागात उपचार सुरू होते. मात्र, प्रकृती खालावत गेल्याने १९ फेब्रुवारी रोजी उपचार सुरू असतानाच वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले.

## लेवा पाटीदार समाजाचा आज सामूहिक विवाह सोहळा



प्रतिनिधी । जळगाव

**अखिल भारतीय लेवा पाटीदार युवक महासंघ व बहिणाई बिग्रेड आयोजित लेवा पाटीदार समाजातील २५ वधू वराचा सामूहिक विवाह सोहळा व जळगांव जिल्ह्यातील लेवापाटीदार समाजातील नवनिर्वाचित महापौर, नगराध्यक्ष व नगरसेवक, नगरसेविकांचा सन्मान सोहळा दि. २२ रोजी सकाळी ११ वा मीराई लॉन, काशी बाई उखाजी कोल्हे शाळे समोर एस. टी बस डेपो शेजारी जळगांव. या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे.**

याप्रसंगी कार्यक्रमाचे स्वागतध्यक्ष आ. सुरेश भोळे हे आहेत. दिपप्रज्वलन आ. एकनाथ खडसे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी प्रमुख अतिथी ना. रक्षा खडसे, माजी खा. डॉ.उल्हास पाटील, आ.अमोल जावळे, माजी आ.शिरीष चौधरी, महापौर दीपमाला काळे, हभप भरत महाराज, डॉ. ए. जी भंगाळे, उल्हास चौधरी, कौशल पाटीले, उद्योजक दीपक चौधरी, स्वप्नील चौधरी, रवि फालक, सुनील पाटील, भुसावळ नगराध्यक्षा गायत्री भंगाळे, फैजपूर नगराध्यक्षा दामिनी सराफ, सावदा नगराध्यक्षा रेणुका पाटील, नशिराबाद नगराध्यक्ष योगेश पाटील, सिंधु कोल्हे, विष्णू भंगाळे, जयश्री महाजन, सीमा भोळे, सुनील खडके, कांती चौधरी, चंदन अत्तरदे , मनीषा खडके, लिलीत चौधरी, उमेश नेमाडे, मनोज चौधरी, चंदन कोल्हे समाजसेवक, उपस्थित राहणार आहे. सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये २५ वधू-वरांचे वैदिक पद्धतीने शुभमंगल सोहळा पार पडणार आहे. याप्रसंगी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी विविध प्रकारच्या समित्या गठित करण्यात आल्या असून कार्यक्रम च्या यशस्वीतेसाठी महासंघाचे अध्यक्ष ॲड. प्रकाशराव पाटील आयोजन समितीचे अध्यक्ष व प्रदेशाध्यक्ष प्रदीप भोळे, प्रदेशाध्यक्षा बहिणाई ब्रिगेड आशा कोल्हे, उपाध्यक्षा हर्षा बोरोले, ज़िल्हाध्यक्षा सुनीता येवले, पूर्व ज़िल्हाध्यक्षा स्वाती भोळे, महानगराध्यक्षा वैशाली झोपे, उपाध्यक्षा नयना भोळे, भावना भोळे, डॉ. डिम्पल पाटील, प्रा. वंदना नेमाडे, मनीषा पाटील. तसेच अ भा लेवा पाटीदार युवक महासंघाचे महानगरध्यक्ष महेश चौधरी, मधुकर भंगाळे, प्रदीप रोटे, अविनाश भोळे, सागर चौधरी, देवा वाणी, सुरेश फालक, अतुल महाजन,सुणवंत झोपे यांचे सह इतर कार्यकर्ते परिश्रम घेत आहे.

## भारतीय संविधान हे समानता, न्याय अन् क्रांतीचा दस्तावेज

प्रतिनिधी । जळगाव

● प्रा. विजय घोरपडे यांचे प्रतिपादन

**आजच्या युवकांना उद्याचा सक्षम भारत घडवायचा आहे. त्यासाठी युवकांनी आपले आचरण संविधानिक मूल्यांना अनुसरून केले पाहिजे. भारतीय संविधान हे केवळ कायद्याचे एक पुस्तक नाही तर समानता, न्याय आणि क्रांतीचा दास्तावेज आहे, असे प्रतिपादन संविधानाचे अभ्यासक व विचारवंत प्रा. विजय घोरपडे यांनी केले.**




कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील शैक्षणिक प्रशाळा-विभाग राष्ट्रीय सेवा योजना एकक यांच्यावतीने आयोजित सात दिवशीय विशेष हिवाळी शिबिरात दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी मआजचे युवक आणि संविधानिक मूल्यफ या विषयावर आयोजित व्याख्याना प्रसंगी ते बोलत होते. या अगोदरच्या सत्रात विद्यापीठातील प्रा. आशुतोष पाटील यांचे म स्त्री- पुरुष सहजीवनफ या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी आपल्या व्याख्यानात मानवी समाजातील स्त्री पुरुष यांच्या सहजीवनाचे महत्व समजावून सांगितले.

### बांधकाम कामगारांचे वस्तू वाटप केंद्रावर कामगारांची लुटमार

प्रतिनिधी । जळगाव

जिल्ह्यातील बांधकाम कामगारांचे वस्तू वाटप केंद्रावर कामगारांना गृहपयोगी वस्तू संच व सुरक्षा संच वाटप करण्यात येतात. यासाठी कामगारांकडून १०० ते ५०० पर्यंत रक्कमेची मागणी करण्यात येते. कामगारांची होणारी ही लुटमार थांबावी तसेच बांधकाम कामगारांना दिलेल्या तारखेवर वस्तू वाटप केल्या जाव्यात अशी मागणी महाराष्ट्र कामगार संघटनाचे जळगाव जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोळी यांनी केली आहे.

## नशिराबादमध्ये शिवजयंती उत्सव जल्लोषात




प्रतिनिधी । नशिराबाद

**नशिराबाद येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त नशिराबाद शहरात यंदा भव्य आणि सर्वसमावेशक उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. १९ फेब्रुवारी रोजी फ्रूट सेल चौक परिसरात झालेल्या सार्वजनिक कार्यक्रमाला विविध समाजघटकांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**

कार्यक्रमाची सुरुवात शिवरायांच्या प्रतिमेस अभिवादन व आरती करून करण्यात आली.यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या शिवचरित्रावर आधारित नृत्य आणि गीत सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. त्यात देवयानी चौधरी हिने हिरकणीच्या ऐतिहासिक घटनेवर भाऊक असे अभिनय पर नृत्य आणि विशेषतः मंदार वाणी या छोट्या कलाकाराने राजे संभाजी यांचा अभिनय करतांना त्यांच्या ग्रुपने अंगावर काटा आणणाऱ्या राजे संभाजी या ऐतिहासिक नाट्य सादरीकरणाने वातावरणात भावनिक व प्रेरणादायी रंग भरले. संपूर्ण कार्यक्रमात देशभक्ती, इतिहासाभिमान आणि शिवभक्तीचा जोश स्पष्टपणे जाणवत होता. कार्यक्रमाला नशिराबाद नगरपरिषद चे नगराध्यक्ष योगेश पाटील, उपनगराध्यक्ष पंकज महाजन, नगरसेवक कीर्तीकांत चौबे, लालचंद पाटील, बापू बोढरे, चेतन बऱ्हाटे, विनोद रंधे, किशोर पाटील, गणेश चव्हाण, तसेच मुकुंदा रोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

उत्सव यशस्वी करण्यासाठी शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सुनील महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली ललित मराठे, विश्वनाथ महाजन, भूषण पाटील, हरीश पाटील, चंदन पाटील आणि सागर मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

शहरातील सर्व समाजघटकांना एकत्र आणणारा हा उत्सव सामाजिक एकोपा, इतिहासाभिमान आणि संस्कृती जपण्याचा संदेश देणारा ठरला. नशिराबादकरांसाठी हा उत्सव अभिमानास्पद आणि प्रेरणादायी ठरल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत काशिनाथ पलोड पब्लिक स्कूलचे यश

प्रतिनिधी । जळगाव

**विवेकानंद प्रतिष्ठान संचालित काशिनाथ पलोड पब्लिक स्कूल, जळगाव येथील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. संजीवनी स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे आयोजित राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत पदके मिळवून शाळेचा गौरव वाढविला.**



या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेचे प्राचार्य प्रवीण सोनावणे सर व समन्वयिका अनघा सागडे यांच्या हस्ते पदक देऊन करण्यात आला. यावेळी प्राचार्य प्रवीण सोनावणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, मेहनतीने यश मिळवा आणि शाळेचे नाव राज्यभर उज्ज्वल करा, असा प्रेरणादायी संदेश दिला. तसेच समन्वयिका अनघा सागडे यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी प्रोत्साहन दिले.

प्रसंगी कराटे प्रशिक्षक ज्ञानेश्वर पवार, क्रीडा प्रशिक्षिका शिल्पा मांडे, क्रीडा प्रशिक्षक ईश्वर जोशी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना कराटे प्रशिक्षक ज्ञानेश्वर पवार यांचे मार्गदर्शन लाभले. या यशामुळे शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे.

# मामलदे शिवारात चिया पीक काढणीवर

## प्रयोगशील शेतकरी प्रवीण पाटील यांचा प्रयोग

प्रतिनिधी । चोपडा

**मामलदे ता. चोपडा येथील प्रयोगशील शेतकरी प्रविण मधुकर पाटील यांनी आपल्या शेतात 'चिया सीड्स'ची लागवड करून एक यशस्वी आणि नाविन्यपूर्ण प्रयोग केला आहे. पारंपारिक पिकांना फाटा देत त्यांनी घेतलेल्या या धाडसी निर्णयाचे सध्या सर्वत्र कौतुक होत असून हे पीक येत्या पंधरवाड्यात काढणीवर येत आहे.**

पाटील यांना एक चक्र शेतकरी उत्पादक कंपनी यांच्या वतीने हे बियाणे उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यासाठी रोहन पाटील यांचेही त्यांना सहकार्य मिळाले. नुकतीच तालुका कृषी अधिकारी दीपक साळुंखे यांनी या प्लॉट ची पाहणी केली.यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी दीपक पाटील,भरत इंगळे, भाऊसाहेब पाटील उपस्थित होते. या पिकाला इतर नगदी पिकांच्या तुलनेत खूप कमी पाण्याची आवश्यकता असते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चिया सीड्सला मोठी मागणी असल्याने शेतकऱ्यांना चांगला नफा मिळण्याची शक्यता आहे. ओमेगा-३ फॅटी सिड आणि फायबरचा उत्तम स्रोत असल्याने याला सुपरफूड मानले जाते.



कमी पाण्यात आणि कमी खर्चात येणारे हे पीक खान्देशातील हवामानातही उत्तमरित्या येऊ शकते, हे पाटील यांनी केलेल्या प्रयोगातून सिद्ध झाले आहे.त्यासाठी कृषी विभागाचेही त्यांना मोलाचे सहकार्य मिळत असल्याचे पाटील यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी आता बाजारपेठेचा कल ओळखून अशा नगदी आणि औषधी पिकांकडे वळणे काळाची गरज आहे.चिया बिया हे त्यापैकीच एक पीक आहे.

**- दीपक साळुंखे**
तालुका कृषी अधिकारी, चोपडा

## शिक्षक पदोन्नतीसाठी आता 'टीईटी' अनिवार्य

प्रतिनिधी । जळगाव

**शिक्षक संवर्गातून पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदांवर पदोन्नती मिळवण्यासाठी आता शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य करण्यात आले आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने १९ जानेवारी रोजी महत्वपूर्ण आदेश निर्गमित केले असून, त्याबाबतची माहिती जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी दिली.**

शासकीय निर्णयानुसार, ज्या शिक्षकांनी शिक्षक पात्रता परीक्षा 'टीईटी' उत्तीर्ण केली आहे आणि पदोन्नतीसाठी आवश्यक असणारी इतर सर्व अर्हता पूर्ण केली आहे, केवळ असेच शिक्षक आता पदोन्नतीसाठी पात्र मानले जाणार आहेत. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद आणि केंद्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडे मार्गदर्शन मागवले होते. या निर्णयामुळे जिल्हा परिषद शिक्षण विभागातील पदोन्नतीच्या प्रक्रियेत आता टीईटी पात्रतेचा निकष अत्यंत कळीचा ठरणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# वरणगाव शहरातील समस्यांकडे ‘नही’चे दुर्लक्ष

## शिवसेना स्टाईल आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । वरणगाव



शहर आणि परिसरातील महामार्गाशी संबंधित प्रलंबित प्रश्नांकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे (नही) लक्ष वेधण्यासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख समाधान महाजन, राजेंद्र चौधरी, विधानसभा प्रमुख संतोष माळी यांच्यासह सर्वच नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. महामार्गावरील त्रुटींमुळे नागरिकांना होणारा त्रास त्वरित दूर न झाल्यास शिवसेना स्टाईलने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा शिवसेनेने निवेदनाद्वारे नही जळगाव कार्यालयाला दिला आहे.

या निवेदनात, समाधान महाजन आणि पदाधिकाऱ्यांनी वरणगाव परिसरातील पाच मुख्य मुद्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. यात दिशादर्शक फलकांचा अभाव प्रामुख्याने जाणवत आहे. वरणगाव हे ५० हजार लोकसंख्येचे शहर असतानाही महामार्गावर तरसोद ते मलकापूरदरम्यान शहराचे नाव असलेले दिशादर्शक फलक नाहीत. यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच महामार्गावर प्रकाश व्यवस्था नसल्याने अडचणी निर्माण होत आहे. भुसावळकडून वरणगावकडे येताना फुलगावजवळ सर्व्हिस रोडवर वस्ती असूनही तिथे पथदिव्यांची सोय नाही. अंधारामुळे या ठिकाणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

### ➤ ‘नही’च्या अधिकाऱ्यांना निवेदन

**फुलगाव येथील रेल्वे पुलाखालील रस्ता अत्यंत खराब झाला असून तिथे पाणी साचते. या पाण्याचा कायमस्वरूपी निचरा करावा. महात्मा ज्योतिबा फुले सर्कलजवळ प्रवाशांच्या सोयीसाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पिकअप शेड उभारावे, या प्रमुख मागण्यांचे निवेदन नहीच्या अधिकाऱ्यांना दिले. यावेळी समाधान महाजन, राजेंद्र चौधरी, संतोष माळी, विलास मुळे, माजी नगरसेवक गणेश धनगर, नगरसेवक विनोद झोपे, रवि कोल्हे, शंकर लोखंडे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.**

# ॲड.वसंतराव भोलाणे यांचा तेली समाजातर्फे गौरव



प्रतिनिधी । धरणगाव

**शहरातील तेली समाजातर्फे ॲड. वसंतराव शिवदास भोलाणे यांचा सत्कार स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या सभागृहात शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन उत्साही वातावरणात पार पडला.**

भारतीय जनता पार्टीच्या सहयोगी संघटना भारतीय जनता पार्टी जळगाव जिल्हा कायदा आघाडीच्या उपाध्यक्षपदी त्यांची नुकतीच निवड झाल्याबद्दल हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार भरत चौधरी तसेच जनकल्याण पतसंस्थेचे मॅनेजर दीपक चौधरी यांनी मनोगत व्यक्त केले. पत्रकार भरत चौधरी यांनी आपल्या मनोगतात ॲड. बापूसाहेब भोलाणे यांच्या सामाजिक बांधिलकी, व्यावसायिक प्रामाणिकपणा आणि समाजाभिमुख कार्याचा गौरव करत, त्यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी धरणी विभागाचे अध्यक्ष नितीन चौधरी, सुभाष दरवाजा विभागाचे अध्यक्ष कैलास चौधरी, तालुका तेली महासंघाचे अध्यक्ष अनिल चौधरी, उपाध्यक्ष शालिक भोलाणे, संतोष चौधरी, चंद्रशेखर चौधरी, काशिनाथ आप्पा, भाजपचे तालुका सरचिटणीस सुनील चौधरी, रमेश शिवदास भोलाणे, अरुण महाले, आबासाहेब महाले यांच्यासह तेली समाजाचे असंख्य बांधव उपस्थित होते. सत्कार सोहळा आनंददायी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी ॲड. भोलाणे यांना भावी कार्यासाठी शुभेच्छा देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## थोडक्यात

### मराठी पेपरला ६३ विद्यार्थ्यांची दांडी

**अमळनेर ।** तालुक्यातील ११ केंद्रांवर दहावीच्या मराठी पेपरच्या पहिल्याच दिवशी ६३ विद्यार्थ्यांनी दांडी मारली असून ३३४२ विद्यार्थ्यांनी सुरळीत पणे पेपर दिला आहे. अमळनेर तालुक्यात दहावी बोर्डाच्या परीक्षेसाठी एकूण ११ केंद्रांवर मराठी माध्यमाचे ३२२६ तर उर्दू माध्यमाचे १७९ विद्यार्थी प्रविष्ट होते यापैकी मराठी माध्यमाला ६१ तर उर्दू माध्यमाला २ विद्यार्थी गैरहजर होते. अमळनेर शहरात डी. आर. कन्याशाळा, जी. एस. हायस्कूल, साने गुरुजी हायस्कूल, जय योगेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, एन.टी. मुंदडा माध्यमिक शाळा तर ग्रामीण भागातील मारवड, वावडे, अमळगाव, शिरूड, कळमसरे, दहिवद या केंद्रांवर दहावीच्या परीक्षेला सुरवात झालेली आहे. तसेच त्या केंद्रांवर झूम मीटिंगच्या सहाय्याने परीक्षा घेतली जात आहे.

### महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत विद्यानंद देठे यांचे यश

**जामनेर ।** तालुक्यातील निमखेडीपिंप्री येथील रहिवासी विद्यानंद रामलाल देठे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंता (श्रेणी-१) पदी निवड झाली आहे. राज्यातून द्वितीय क्रमांक संपादन केला आहे. तो निवृत्त सैनिक रामलाल कडू देठे यांचा चिरंजीव आहे. याच कुटुंबातील त्यांचे चुलत बंधू व न्यू इंग्लिश स्कूल फत्तेपूरचे माजी विद्यार्थी सागर देठे यांचीही २ वर्षांपूर्वी भारतीय लोकसेवा आयोगामार्फत जिल्हाधिकारीपदी निवड झाली होती. निमखेडीसारख्या छोट्या गावातून एकाच कुटुंबातील दोघांनी भारतीय व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल विद्यानंद रामलाल देठे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# चोपडा महाविद्यालयात राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन फिजिक्स क्विझ स्पर्धा उत्साहात

प्रतिनिधी । चोपडा

**येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे दादासाहेब डॉ.सुरेश जी.पाटील महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाईन फिजिक्स क्विझ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांमधून एकूण ४२८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.**



या कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष ॲड. संदीप पाटील, सचिव डॉ.स्मिता पाटील यांच्याहस्ते फीत कापून करण्यात आली. याप्रसंगी प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ. के.एन.सोनवणे, उपप्राचार्य प्रा.डॉ.आर. एम.बागुल, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी.एम. रावतोळे, समन्वयक डॉ.व्ही. आर. हुसे यांची प्रमुख उपस्थिती होती.ही स्पर्धा मेंटीमीटर सॉफ्टवेअरच्या माध्यमातून घेण्यात आली. यामध्ये इयत्ता ११ वी व १२ वीच्या अभ्यासक्रमावर आधारित एकूण ८० प्रश्न विचारण्यात आले होते. प्रत्येक प्रश्नासाठी ४५ सेकंदांचा वेळ देण्यात आला होता. अचूक उत्तर लवकरात लवकर देणाऱ्या विद्यार्थ्याला अधिक गुण अशा स्वरूपाची ही स्पर्धा होती. ८० प्रश्नांनंतर अंतिम निकाल जाहीर करण्यात आला. त्यात प्रथम क्रमांक (५ हजार रुपये व स्मृतीचिन्ह): मकरंद रवींद्र पाटील (एसएसबीटी इंजिनिअरिंग कॉलेज, बांभोरी), द्वितीय क्रमांक (३ हजार रुपये व स्मृतीचिन्ह): नम्रता शांताराम पाटील (एसएसबीटी इंजिनिअरिंग कॉलेज, बांभोरी), तृतीय क्रमांक (२ हजार रुपये व स्मृतीचिन्ह): वरद महेश पवार (विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल, चोपडा), उत्तेजनार्थ पारितोषिक (प्रत्येकी १ हजार रुपये): सिद्धेश्वरी राहुल शिरसाठ (चांदवड पॉलिटेक्निक) आणि आयुष मिश्रा (लखनौ विद्यापीठ) या विद्यार्थ्यांनी प्राप्त केली.

या स्पर्धेचे विभागप्रमुख डॉ. पी. एम. रावतोळे यांनी आयोजक म्हणून काम पाहिले. प्रास्ताविक व समन्वय डॉ. विष्णू आर. हुसे यांनी केले. सूत्रसंचालन कु.सिद्धी नेवे आणि आभार निरंजन पाटील यांनी मानले.

### सुनसगाव पुलावर मोटारसायकल घसरुन पती पत्नी जखमी

**भुसावळ ।** वाघुर नदीच्या पुलावर मोटारसायकल घसरुन पतीपत्नी जखमी झाल्याची घटना दि.२० रोजी संध्याकाळी ५.३० वाजेच्यादरम्यान घडली. गोंभी येथील रहिवासी दशरथ बुधो सोनवणे (मिस्तरी) हे आपल्या पत्नी सोबत लग्नाच्या कार्यक्रमासाठी बाहेर गावी गेले होते तेथून घराकडे परत येत असताना सुनसगावनजीकच्या वाघुर नदीच्या पुलावर वाळू पडलेली असल्याने मोटरसायकल घसरली व पती पत्नी जखमी झाले.

# मराठी वाङ्मय मंडळात शिवजयंती साजरी

प्रतिनिधी । अमळनेर



**स्वराज्याचे संस्थापक, शाश्वत विकासाची हमी देणारे तत्वज्ञान सांगणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार व कार्य आत्मसात करणे महत्वाचे आहे. हे लक्षात घेऊन येथील मराठी वाङ्मय मंडळात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून मराठी वाङ्मय मंडळाचे उपाध्यक्ष डॉ.रविंद्र कुलकर्णी, ज्येष्ठ मार्गदर्शक अजय केले, डॉ.महेश पाटील, डॉ.विजय तुंटे यांनी अभिवादन केले.**

याप्रसंगी आर.डी.पाटील, चंद्रकांत शिंदे, गोविंद पाटील, हनुमंत पाटील, शांताराम पाटील, हेमंत बाळापुरे, जगदिश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# अमळनेरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार उभारणीस मान्यता

प्रतिनिधी । अमळनेर



**येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक परिषदेच्या सर्व पदाधिकारी व समाजबांधवांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आणि माजी मंत्री तथा आ. अनिल भाईदास पाटील यांच्या सक्षम प्रयत्नाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर भव्य प्रवेशद्वार उभारण्यास शासन स्तरावर मंजुरी मिळाली असल्याची माहिती डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक परिषदेच्यावतीने देण्यात आली आहे.**



या संदर्भात अध्यक्ष नरेंद्र संदानशिव, ॲड.एस.एस.ब्रह्मे, प्रा.डॉ.विजय तुंटे, प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, प्रा.विजय खैरनार, प्रा.विजय वाघमारे, डॉ.राहुल निकम, प्रा.डॉ.माधव भुसनर, प्रा.भानुदास गुलाले, प्रा.जितेंद्र संदानशिव, डॉ.आर.सी.सरवदे, डॉ. रवि बाळसकर, प्रा.जयेश साळवे, डॉ.बालाजी कांबळे, बौद्धचार्य बापुराव संदानशिव, बौद्धचार्य निकम, बौद्धचार्य अरुण घोलप, डी.आर. सैंदाणे, बौद्धाचार्य मैराळे, राजू भालेराव, अर्जुन कढरे, ॲड. प्रशांत संदानशिव, विजय संदानशिव, किरण संदानशिव, विनोद बिऱ्हाडे, ज्ञानेश्वर संदानशिव, संजय बिऱ्हाडे, गोकुळ बिऱ्हाडे, भिका संदानशिव आदींनी वर्षभरापूर्वी आ. अनिल पाटील यांना साकडे घातले होते. या मागणीचा सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर शासन स्तरावर मंजुरी मिळून प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. या प्रकल्पासाठी ५० लाख रुपये मंजूर झाले असून, त्यामुळे लवकरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर भव्य प्रवेशद्वार प्रत्यक्षात उभारले जाणार आहे.

# धरणगाव तालुक्यात वातावरणात चढउतार

प्रतिनिधी । धरणगाव

**तालुक्यातील आनोरे, धानोरे, गारखेडे परिसरासह तालुक्याच्या वातावरणात चढउतार अनुभवयास येत आहे. सकाळी थंडी तर दुपारी उन्हाचे चटके जाणवू लागले आहे. मध्येच ढगाळ वातावरण तयार होत असल्याने पावसाची भीती देखील बळीराजाला सतावू लागली आहे.**



गहू, हरभरा काढणीला असतांना वातावरणात चढउतार दिसू लागल्याने शेतकरी भयभीत झालेला आहे. आधीच वादळाने मका पिकाचे नुकसान केले असून फक्त पंचनामे करून शासनाने तोंडाला पाने पुसली आहेत. मात्र, अद्याप कोणतीही आर्थिक मदत जाहीर झालेली नाही. बहुतेक शेतकऱ्यांनी गहू सोबतच हरभरा पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात केल्याचे दिसून येत आहे. मध्येच ऊन, सावली तसेच थंडीचा खेळ सुरू असल्याने वातावरणात बदल होत आहे.

# धरणगाव तालुका शासकीय सेवानिवृत्त कर्मचारी संघटना अध्यक्षपदी वाय.डी.महाजन तर सचिवपदी प्रा.बी.एन.चौधरी

प्रतिनिधी । धरणगाव

**तालुक्यातील सर्व सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या जेष्ठ सेवानिवृत्त कर्मचारी बहुउद्देशीय संस्थेची सर्वसाधारण सभा नुकतीच संपन्न झाली. या सभेत पुढील तीन वर्षांसाठी नुतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. यात अध्यक्षपदी यशवंत देवराम महाजन यांची तर सचिवपदी प्रा. भटू नारायण चौधरी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.**





उर्वरीत कार्यकारिणी अशी, उपाध्यक्षपदी प्रकाश यशवंत बाजपाई, सहसचिवपदी प्रा. अरुण गोंविदराव शिंदे तर कोषाध्यक्षपदी राजेंद्रसिंह नगीनसिंह पुरभे यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून श्रीमती दमयंतीबाई रघुनाथ पाटील, मधुकर हिलाल पाटील, राजेंद्र शामराव पडोळे, देविदास सखाराम वाणी, कैलास रामचंद्र वाघ, उमाकांत सुरेश बोरसे काम पाहणार आहे. नुतन कार्यकारिणीचे जेष्ठ सदस्य प्रा. आर. एन. महाजन, प्रा. सी. एस. पाटील, व्हि. एस. पोतदार, सी. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी केली असून सहाय्यक संस्था निबंधक, जळगाव यांनी महा-५३ जळगाव/१०/२/२६ या क्रमांकाने संस्थेची नोंदणी केली असून तसे नोंदणी प्रमाणपत्र संस्थेला प्राप्त झाले.

संस्था रजिस्टर नोंद झाल्याने संस्था विस्तार आणि संस्थेची स्वतः ची इमारत निर्माण करणेकामी गती प्राप्त होणार आहे. सभासदांच्या अडचणी, समस्या सोडविण्यासाठी संस्था सदैव कार्यप्रवण राहील, असे आश्वासन संस्थाध्यक्ष वाय. डी. महाजन आणि सचिव प्रा.बी. एन.चौधरी यांनी दिले आहे. नुतन कार्यकारिणीचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

# छावा नाटिकेतून साकारला शिवरायांचा जीवनपट

## • शिवजयंतीनिमित्त पंकज माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी उपक्रम

प्रतिनिधी । चोपडा

पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती ढोल ताशांच्या गजरात आणि शिवकालीन विविध वेशभूषेत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक व्हि.आर.पाटील यांनी शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने झाली.

याप्रसंगी विजया पाटील यांनी यांनी शिवरायांच्या शौर्य, पराक्रम व स्वराज्य स्थापनेविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले आणि इतिहासाबाबत जागृतता केली.



कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसत होता. ढोल ताशांच्या गजरात जणू काही शिवकालीन युगात गेल्याचा भास निर्माण झाला. मानव पगार व स्वप्नील पाटील या विद्यार्थ्यांनी स्फुर्तीदायक गीत गायन केले. त्यामुळे वातावरण शिवमय झाले होते. पंकजा पाटील, देवयानी पाटील, मृणाली वळवी या विद्यार्थिनींही झुलवा पाळणा या गीतावर उत्कृष्ट नृत्य सादर करत उपस्थितांच्या टाळ्या मिळवल्या. रिद्धी गोसावी, लावण्या माळी, माहेश्वरी नाथबुवा, दिक्षा पाटील, ऋतुजा देसले, विद्या बारेला, नंदिनी पाटील, अश्विनी अत्तरदे यांनीही उत्कृष्ट समूह नृत्य सादर केले. विरेन पाटील, उत्कर्ष धनगर, पार्थ दाभाडे, दक्षराज पाटील, हर्षल पाटील, आदित्य बाविस्कर, पार्थ परदेशी, आयुष रायसिंग, दुर्गेश पाटील, लोकेश पाटील या विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या जीवनावर आधारीत छावा नाटिका सादर करतांना अंगावर शहारे आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या जीवनावर आपले विचार मांडले. तसेच देशभक्तीपर गीते, पोवाडे आणि लेझीम नृत्य सादर करून वातावरण शिवप्रेमाने भारावून गेले. असंख्य विद्यार्थ्यांनी शिवरायांचे मावळे, जिजाऊ यांच्या वेशभूषेत येऊन त्यांच्या पराक्रमाची झलक दाखवली.या कार्यक्रमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील इतिहास जागृततेला चालना मिळाली.

**संपूर्ण शालेय परिसर छत्रपती शिवाजी महाराज की जय या घोषणांनी दुमदुमला. युक्ती अतुल महाजन व वैष्णवी भिमराव पाटील या विद्यार्थिनींनी सूत्रसंचालन केले. तर पौर्णिमा भादले, वैशाली पाटील, बाजीराव तायडे, जयेश मंडपे, अविनाश पाटील, दिपक सोनवणे व सर्व शिक्षक आणि कर्मचारी वृंदांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.**

# चाळीसगाव न्यायालय परिसरात वकिलावर प्राणघातक हल्ला

प्रतिनिधी । चाळीसगाव

**शहरातील न्यायालय परिसरात दुपारी घडलेल्या धक्कादायक घटनेत प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. समीर शेख यांच्यावर पाच ते सहा जणांनी धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात ॲड. शेख जखमी झाले असून त्यांच्यावर बापजी हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.**

याबाबत माहिती अशी की, संबंधित वाद हा प्लॉट व्यवहाराशी निगडित असून सुमारे ३ लाख रुपयांची टोकन रक्कम देण्यात आली होती. त्यानंतर पुढील खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्याच्या मागणीवरून दोन्ही बाजूंमध्ये वाद निर्माण झाला. हा वाद चिघळत न्यायालय परिसरातच पोहोचला. दुपारच्या सुमारास न्यायालय परिसरात उपस्थित असताना ५ ते ६ जणांनी ॲड. समीर शेख यांना घेरून धारदार शस्त्राने हल्ला केला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. जखमी अवस्थेतील शेख यांना उपचारासाठी बापजी हॉस्पिटल येथे दाखल केले. घटनेनंतर वकिलांनी तीव्र संताप व्यक्त केला. घटनेमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.